झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,पुणे व पिंपरी चिंचवड
क्षेत्र, मुथ्था चेंबर्स, सेनापती बापट रोड, पुणे- १६.
जा.क्र. झोपुप्रा /सप्रा-१/ मा.क्र.२४१/पर्वती/२३०८/२०२३
दिनांक : ११ /१२ /२०२३.

## झोपडपट्टी पुनर्वसन आदेश (अंतिम)

महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ चे कलम ३ क अन्वये अंतिम आदेश.

**प्रस्तावना -**

महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ (प्रस्तुत आदेशात या अधिनियमाचा उल्लेख यापुढे उक्त अधिनियम असा करणेत आला आहे) चे कलम ३अ नुसार महाराष्ट्र शासन, गृहनिर्माण विभाग, अधिसूचना क्र. झो.पु.यो.-२००४/ प्र.क्र.२१३/झोपसु-१, दि. ३०/०६/२००५ अन्वये पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राकरिता झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे या प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे;

झोपडपट्टी पुनर्वसन या प्राधिकरणाकडून उक्त अधिनियमाच्या कलम ३ब मधील तरतुदींनुसार पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकांच्या क्षेत्रासाठी सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना तयार करणेत आलेली असून शासनाच्या मान्यतेने सदरची सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दि.०१/१२/२००५ रोजी अंतिमत: प्रसिध्द करण्यात आलेली आहे;

(२) ज्याअर्थी, पुणे महानगरपालिका हद्दीतील खालील अनुसूचीमध्ये नमुद पर्वती येथील स.नं.१३२अ, फा. प्लॉट ५२८/२६, ५२८/२६अ, ५२८/२७, ५२८/२८,५२८/२९, पर्वती, पुणे या नावाने ओळखल्या जाणाऱ्या झोपडपट्टी क्षेत्रामधील (अंशत:) फा. प्लॉट ५२८/२८,५२८/२९ अंदाजे क्षेत्रफळ १७९१.९१ चौ.मी. (प्रस्तुत जाहीर प्रकटनात या मिळकतीचा उल्लेख यापुढे सदर मिळकत असा करणेत येत आहे) सदर क्षेत्रावर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेसाठी विकसक मे. नमन एंटरप्राईझेस यांचेमार्फत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे झोपडपट्टी पुनर्वसनाचा प्रस्ताव दि. १२/०४/२०१७ रोजी सादर करणेत आलेला आहे आणि, सक्षम प्राधिकारी क्र.१, झो.पु.प्रा.,पुणे यांनी सदर प्रकरणात ७० % हून जास्त झोपडीधारकांचे संमतीपत्र प्राप्त असल्याचे प्रमाणीत केले आहे; आणि,

(३) ज्याअर्थी, अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या मिळकतीवर झोपडपट्टी असलेने प्रत्यक्ष जागेवरील मोजणी नुसार एकूण क्षेत्र १७९१.९१ चौ.मी. असल्याचा अहवाल प्राप्त झालेला आहे; आणि,

(४) ज्याअर्थी, सदरचे क्षेत्र झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करण्याची दि.२२/०८/२०२३ रोजीची पुर्वसूचना महाराष्ट्र शासन राजपत्र भाग एक - पुणे विभागीय पुरवणी, गुरुवार ते बुधवार, ऑगस्ट ३१ ते सप्टेंबर ६, २०२३/भाद्र ९-१५, शके १९४५, पान क्र. ०९ ते १० मध्ये तसेच दै.जनमंथन व दै. बहुजनरत्न लोकनायक या वृत्तपत्रात दि. ३१/०८/२०२३ रोजी प्रसिध्द करणेत आली आहे. तसेच, सदरची पुर्वसूचना सर्वांना ठळकपणे दिसुन येईल अशा ठिकाणी प्रत्यक्ष जागेवर दि. ०१/०९/२०२३ रोजी डकवून प्रसिद्ध करण्यात आली आहे; आणि,

(५) ज्याअर्थी, अनुसूचीमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) सुधारित अधिनियम २०१७ चे कलम ३(क) नुसार झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करणेकरीता मुख्य कार्यकारी अधिकारी,झो.पु.प्रा.,पुणे हे सक्षम आहेत; आणि,

(६) ज्याअर्थी, अनुसूचीमध्ये नमूद एकूण १७९१.९१ चौ.मी. एवढे योजना क्षेत्र हे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करणेकामी समर्थनीय ठरणारी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल माझी खात्री झालेली आहे; आणि,

(७) ज्याअर्थी, सदर प्रकरणी दि. २२/०८/२०२३ रोजी अधिनियमाच्या कलम ३ (क) नुसार झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र निर्धारणा करणा-या आदेशा संदर्भात प्रसिद्ध केलेल्या पुर्वसूचने संदर्भात हरकती प्राप्त न झाल्याने

प्रकरणातील वस्तुस्थिती विचारात घेता प्रस्तावित क्षेत्र हे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करण्यासंदर्भात आदेश पारित करणे आवश्यक आहे;

त्याअर्थी, मी नीलेश र. गटणे, मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपुप्रा., पुणे, उक्त अधिनियमाच्या कलम ३क मधील नमूद तरतूदीनुसार उक्त अधिनियमाच्या कलम ४(१) मधील तरतुदीनुसार मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार खालील अनुसूचीमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र या आदेशाद्वारे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करण्यासंदर्भात खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे .

**आदेश :-**

(१) सदर झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करण्या संदर्भातील दि.२२/०८/२०२३ रोजीचा पूर्वसुचना आदेश कायम करून खालील अनुसूचीमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र या आदेशाद्वारे अधिनियमांतर्गत कलम ३ (क) नुसार झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करण्यात येत आहे.

(२) सदरच्या आदेशामुळे व्यथित होणाऱ्या व्यक्तीस, उक्त अधिनियमाच्या कलम ३(क) मधील तरतूदीनुसार प्रस्तुत आदेश प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत मा. शिखर तक्रार निवारण समिती, वांद्रे, मुंबई यांचे कार्यालयात अपील दाखल करता येईल.

## अनुसूची

**झोपडपट्टीचे नाव :** स.नं.१३२अ,फा. प्लॉट ५२८/२६, ५२८/२६अ, ५२८/२७, ५२८/२८,५२८/२९, पर्वती, पुणे

**महानगरपालिका क्षेत्र :** पुणे महानगरपालिका.

| गाव | स.नं./ सि.स.नं. | जमीनी भोगवटदाराचे हक्क प्राप्त असलेल्या संस्थेचे नाव | क्षेत्र (चौ.मी.) (त्रिमीती पद्धतीने प्रत्यक्ष जागेवरील मोजणी नुसार) | चतु:सिमा |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| पर्वती , पुणे | फा.प्लॉट ५२८/२८, ५२८/२९ | खाजगी | १७९१.९१ चौ.मी. | पुर्वेस - फा.प्लॉट ५२८/२८, ५२८/२९, |
| | | | | पश्चिमेस - फा.प्लॉट ५२८/२६+२७+२८ |
| | | | | दक्षिणेस - कॅनॉल |
| | | | | उत्तरेस - सिंहगड रस्ता |

सदरचा आदेश हा माझे सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह पारित करण्यात येत आहे.

**स्थळ :-** पुणे.

**दिनांक :-** ११ /१२ /२०२३.

नीलेश र. गटणे, (भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

प्रत :- रजि. पोस्ट द्वारे - राजीवगांधीनगर, पर्वती, पुणे येथील झोपडपट्टी पुनर्वसन आदेश घोषीत करण्याच्या संदर्भातील कलम ३ क अंतर्गत अंतिम आदेश

१. सक्षम प्राधिकारी क्र १, झोपुप्रा पुणे यांना सूचित करण्यात येते कि या अधिसूचनेच्या प्रती योजना क्षेत्र / झोपडपट्टी क्षेत्रात डकवून प्रसिद्ध करण्यात याव्यात व प्रसिद्धी अहवाल प्रकरणात समाविष्ट करण्यात यावा

२. मा. आयुक्त, पुणे महानगरपालिका यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी

३. व्यवस्थापक, मुद्राणालय, येरवडा कारागृह, पुणे-०६
वरील अधिसूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिद्ध करून त्याच्या ५ प्रति या कार्यालयास देयकासह पुरविण्यात याव्यात .

४. विकसक मे. नमन एंटरप्राईझेस, सि.स.नं. ११२५, शितल प्लाझा , हॉटेल ऑंबेसेडर, मॉडेल कॉलनी, शिवाजीनगर, पुणे, पुणे - ०४.